आर.डी. क्र.२०/२०१०
हबिबखा वि. शशिधरण
नि.क्र.१२२ चा भाग

**ऋणकोतर्फे साक्षीदार क्र.०३ चा सरतपास**
देवाची शपथ खरे सांगतो

**नाव –**अंजली प्रशांत गभणे,
वय–५० वर्ष, व्यवसाय–भुमिअभिलेख कार्यालय, उमरेड
पत्ता–बेसा रोड, नागपुर.

**<u>सरतपास शपथेवर ऋणकोतर्फे वकील श्री बी.एस.मणे यांच्यामार्फत शपथेवर सुरू.</u>**

**४.** मी अडीच वर्षापासुन भुमी अभिलेख कार्यालय उमरेड येथे कार्यरत आहे. मी मौजा उमरेड येथील शीट क्र.५०, भुमापण क्र.३१५१ या मालमत्तेचा मी अभिलेख सोबत आणलेला आहे. मालमत्तेसंबंधीची नोंदणी आम्ही फेरफारच्या अनुषंगाणे घेतो. मी वादमिळकतीचा फेरफार सोबत आणलेला आहे. आता मी सोबत आणलेला फेरफार क्र.४५६ बघीतला त्याप्रमाणे अर्जदार हबीबखा शेरखा पठाण यांनी जो फेरफार करण्यासंबंधीचा अर्ज दिला होता त्याप्रमध्ये न.भू.क्र.३१५१ चे क्षेत्र २.८ चौ.मी. नमुद केलेले होते.

**५.** त्यानंतर मी आमच्या कार्यालयामधुन मालमत्ता क्र.३१५१ या मालमत्तेच्या दि.०८/१२/२००३ च्या मुळ खरेदीखताची प्रमाणित प्रत सोबत आणलेली आहे. सदर खरेदीखत हे धनजीभाई वालजीभाई सोरटीया(पटेल) यांनी हबीबखा शेरखा पठाण यांना करून दिलेले आहे. सदर खरेदीखत हे शिट क्र.५० च्या न.भू.क्र.३१५१ या मिळकतीचे आहे.

<u>ऋणको यांचे वकील श्री.बी.एस.मणे यांनी लेखी अर्ज दाखल करून दस्तऐवज दाखल करण्याकामी प्रकरण तहकूब करण्याची विनंती केली.</u>

**<u>सबब सरतपास तहकूब करण्यात आला.</u>**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि.न्यायाधीश क.स्तर, उमरेड
दि .०४.१०.२०२५

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि.न्यायाधीश क.स्तर, उमरेड
उमरेड